प्रेस नोट १२/०८/२०१९

मा.पोलीस अधीक्षक श्री.संदिप पाटील सो यांनी स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. पद्‌माकर घनवट व स्टाफला बेकायदेशीर शस्त्र बाळगणारे तसेच रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे फरारी आरोपी पकडणेकामी विशेष मोहिम राबविणेबाबत आदेशीत केलेले होते

त्यानुसार, दिनांक १२/०८/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पद्‌माकर घनवट सो यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील सहा.फौजदार दिलीप जाधवर, पोलीस हवालदार महेश गायकवाड, निलेश कदम, विद्याधर निचित, दत्तात्रय तांबे, पोलीस नाईक गुरू गायकवाड, सुभाष राऊत यांचे पथकास सुचना दिलेल्या होत्या.

नमुद पथकाने गोपनीय बातमीदाराकडून बातमी काढली असता इसम नामे महादेव पांगारकर याचे कमरेला पिस्टल अंगात निळा शर्ट, निळी जीन पॅंट व राहूल भिलारे याचेकडे तलवार अंगात पिवळा शर्ट, निळी जीन पॅंट असून ते दोघे काळे रंगाचे पुढे नंबर नसलेल्या पल्सर मोटरसायकलवर दत्तवाडी रोड रेल्वे पुलाजवळ येणार आहे अशी गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या बातमीचे अनुशंगाने दत्तवाडी रोड रेल्वे पुलाजवळ सापळा लावून पळून जाण्याचा प्रयत्नात असणारे इसम नामे १) महादेव उर्फ हंटर पोपट पांगारकर वय २४ वर्षे रा.सहजपूर, पांगारवस्ती ता.दौंड जि.पुणे व २) राहूल सुरेश भिलारे वय २७ वर्षे रा.जावजीबुवाची वाडी, विठ्ठल मंदिरजवळ ता.दौंड जि.पुणे यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात एक काळे रंगाचा लोखंडी बॉडीचा गावठी पिस्टल, एक पिवळे धातुचे जिवंत काडतुस (बुलेट), ;एक स्टीलचे रंगाची लोखंडी तलवार अशी घातक शस्त्रे, एक काळे रंगाची बजाज पल्सर- २२० मोटार सायकल व एक सोनेरी रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकुण किं.रू. १,२१,६००/- किंमतीचा मुद्देमाल मिळून आलेला असून पुढील कारवाईकामी आरोपी व मुद्देमाल लोणीकाळभोर पोलीस स्टेशनला जमा केलेले असून सध्या मा. जिल्हाधिकारी सो., पुणे यांचे आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) चा अंमल जारी असल्याने आरोपीविरूध्द भारतीय हत्यार कायदा कलम ३,४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील दोन्ही आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्यांचेविरूध्द लोणीकाळभोर व यवत पोलीस स्टेशन येथे दरोडा, जबरी चोरी, गंभीर दुखापत, बेकायदेशीरपणे शस्त्रे जवळ बाळगणे अशाप्रकारचे एकुण ९ गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी नक्की कोणत्या कारणांसाठी बेकायदेशीपणे शस्त्रे बाळगली होती याबाबतचा तपास लोणीकाळभोर पोलीस स्टेशन करीत आहेत.


महाराष्ट्र पोलीस